**नियमित फौजदारी खटला क्र.१६६/२०२५ मधील निशाणी क्रमांक ३२ वरील आदेश.**

(CNR NO.MHSN070008742025)

महाराष्ट्र सरकार वि. सचिन अनिल माने वगैरे

सदरचा अर्ज प्रस्तुत प्रकरणातील खबरी/अर्जदार सलोनी सुधाकर साबळे यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता ४९७ अन्वये पोलीस ठाणे कवठेमहांकाळ गुन्हा नोंद क्रमांक ४९१/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ) व ३३१ (४) सह कलम ३ (५) या गुन्ह्यात पोलीसांनी जप्त केलेले अर्ध्या तोळयाचे दोन्ही कानातील सोन्याचे पाच ग्रॅम वजनाचे टॉप्स सुपुर्तनाम्यावर परत मिळण्याकरता दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अर्जदार यांनी स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे.

०२. सदर जप्त सोन्याचा मुद्देमाल पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास तो झिजण्याची शक्यता आहे. अर्जदार हे न्यायालय सांगेल त्या अटींची पुर्तता करण्यास तयार आहेत. म्हणुन सदर मुददेमालाचा ताबा सुपुर्तनाम्यावर त्यास मिळावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत प्रकरणामध्ये तपासिक अंमलदार यांनी नि.क्र. ३४ वर त्यांचे म्हणणे सादर करुन त्यात नमूद केले आहे की, सदर गुन्हयात पोलिसांनी ४ ग्रॅम ९९० मिलीचे दोन्ही कानातील सोन्याचे टॉप्स अंदाजे रक्कम रुपये २०,०००/- जप्त केलेला आहे. सदरचा सोन्याचा मुददेमाल अर्जदार यांना योग्य त्या अटी व शर्तीवर देण्यास हरकत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जाखाली दाखल करुन कथन केले की, सदरचा मुददेमाल अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास मुददेमालामध्ये अर्जदार बदल करण्याची शक्यता आहे. सदरचा मुददेमाल अर्जदार विक्री करण्याची दाट शक्यता आहे. प्रस्तुतचा मुददेमाल

पुराव्यासाठी अत्यंत महत्वाचा आहे सबब अर्ज नामंजुर करावा, अशी विनंती केली आहे.

०४. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्हीही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदरचा मुददेमाल अर्जदाराच्या मालकी व ताब्याचा आहे. सदरचा मुददेमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आला आहे. जप्त मुददेमालाची अर्जदारास आवश्यकता आहे. करीता अर्ज मंजूर होण्याची त्यांनी विनंती केली. उलटपक्षी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, जप्त सोन्याचा मुददेमाल पुराव्याचा भाग असल्याने अर्जदारास परत करता येणार नाही. करिता अर्ज नामंजुर करण्याची त्यांनी विनंती केली.

०५. अभीलेखावरील दाखल वर्दी जबाबाच्या अवलोकनावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणातील मुददेमाल अर्जदाराच्या घरामधून चोरीला गेलेला होता. त्याबाबत मूळ फिर्यादी/अर्जदार यांनी नि.क्र. ३७ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले असून त्यात नमूद केले आहे की मुददेमालाची मूळ पावती त्यांच्याकडून गहाळ झाली आहे. सदर मुददेमाल हा त्यांनी खरेदी केला असून सदरचा मुददेमाल त्यांच्या घरातून चोरीला गेला आहे व तो मुददेमाल त्यांचाच आहे. प्रस्तुत अर्जदार यांनी दिलेल्या वर्दीजबाबामध्ये चोरीला गेलेल्या मुददेमालाच्या वर्णनामध्ये एकूण ४ सोन्याच्या वस्तू व रक्कम रुपये १५,०००/- चोरीला गेली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामध्ये तीन नंबरला दोन कानातील सोन्याचे टॉप्स असे नमूद केले आहे. तसेच तपासादरम्यान चोरीला गेलेल्या मुददेमालापैकी सोन्याचे दोन कानातील टॉप्स वजन ४ ग्रॅम ९९०मिली हे जप्त करण्यात आले आहे. ज्याअर्थी मूळ खबरी यांनी चोरीला गेलेल्या मुददेमालामध्ये सदर मुददेमालाचे वर्णन केले आहे व सदर मुददेमाल हा त्यांच्या घरातून चोरीला गेला आहे त्याअर्थी सदर मुददेमाल हा प्रस्तुत अर्जदार यांच्या

ताब्यातून चोरीला गेला होता असे दिसून येते. जंगम मालमत्ता ही ज्याच्या ताब्यात आहे त्याच्या मालकीची आहे असे कायदयाचे गृहीतक आहे. तसेच तपासी अधिकारी यांनी दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये असे स्पष्ट कथन केले आहे की गु.र.नं. ४९१/२०२४ च्या तपासादरम्यान सदर वस्तू जप्त करण्यात आल्या असून सदर वस्तू योग्य त्या अर्टी व शर्तीवर अर्जदारास परत करण्यात हरकत नसल्याचे कथन केले आहे.

०६. वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार जप्त मुददेमाल म्हणजेच सोन्याचे दागीन्यांचे मालक असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर मुददेमाल हा पुराव्यासाठी आवश्यक असल्याने व मुददेमाल परत केल्यास अर्जदार त्याची विक्री करण्याची शक्यता येत असल्याच्या आक्षेपांचा विचार करता मुददेमालाचा अंतरिम ताबा देतेवेळी अर्जदार यांच्यावर अटी व शर्ती लादणे न्याय्य होईल. सदरचा सोन्याचा मुददेमाल पोलीस ठाण्यात पडुन राहिल्यास अर्जदार यांना त्याचा उपभोग घेण्यास मुकावे लागणार आहे. तसेच अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही सदर मुददेमालाचा ताबा मागितलेला नाही. करिता सदर मुददेमालाचा अंतरिम ताबा अर्जदारास देणे योग्य ठरते. वरील कारणांवरुन प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित ठरते. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. तपासी अंमलदार यांनी जप्त केलेले ४ ग्रॅम ९९० मिलीचे दोन्ही कानातील सोन्याचे टॉप्स अंदाजे रक्कम रुपये २०,०००/- असा मुददेमाल अर्जदार सलोनी सुधाकर साबळे राहणार नागज, तालुका कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली यांना रक्कम रुपये १,००,०००/- (एक लाख रुपये) चा सुपुर्तनामा (Indemnity Bond)

लिहुन दिल्यावर व त्याची योग्य ओळख पटवुन दिल्यानंतर, खालील अटींवर देण्यात यावा.

**अ.** अर्जदारने सदर गुन्ह्याचा अंतिम निकाल होईपावेतो सदरचा मुद्देमाल कोणत्याही मार्गे हस्तांतर करु नये अगर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.

**ब.** अर्जदारने न्यायालय हुकुम करेल त्यावेळी सदरचा मुद्देमाल न्यायालयात हजर करणेचा आहे.

**क.** तपासी अधिकारी यांनी अर्जदारच्या खर्चाने सदर मुददेमालाचे छायाचित्रे काढुन त्याचा पंचनामा तयार करावा. सदर छायाचित्रे, पंचनामा व सदर हानिरक्षण बंधपत्र प्रस्तुत प्रकरणात दाखल करावे.

KADAM NUTAN SACHIN
Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2026.07.02 14:41:59 +0530

दिनांक ०२.०७.२०२६ ( श्रीमती एन एस कदम )

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

कवठेमहांकाळ. कवठेमहांकाळ.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 02.07.2026
Order signed by the
Presiding Officer on -02.07.2026
Order uploaded on 02.07.2026